# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.01.2025** **वार- रविवार**

---

**अहिल्यादेवी**

भारतीय संस्कृतीच्या प्रतिकांचं संवर्धन करत राष्ट्रीय एकतेच्या पुनर्स्थापनेचं कार्य पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी केलं, असं प्रतिपादन राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका व्ही. शांताक्का यांनी काल पुण्यात केलं. एकता मासिक आणि राष्ट्र सेविका समितीच्या वतीने आयोजित अहिल्यादेवी विशेषांकाच्या प्रकाशन समारंभात त्या बोलत होत्या. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विवेक समुहाचे प्रबंध संपादक दिलीपराव करंबळेकर, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. अहिल्यादेवींनी त्या काळात केलेलं असामान्य कर्तृत्व आजही दीपस्तंभासारखं आहे असं राम शिंदे यावेळी म्हणाले.

**खासदार**

केंद्रीय राज्यमंत्री खासदार मुरलीधर मोहोळ यांनी आज पुणे शहरातील शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात पांडवनगर इथं खासदार जनसंपर्क सेवा अभियान आयोजित केलं होतं. यावेळी उपस्थित नागरिकांना त्यांच्या सूचना आणि समस्या याबाबत थेट खासदारांशी संवाद साधता आला. पुणे महानगरपालिका, राज्य शासन आणि केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देणारी दालनं इथे होती.

**पालकमंत्रीपद**

पुण्यातील तीन आमदारांना पालकमंत्रीपदी नियुक्त करण्यात आलं आहे. यामध्ये अजित पवारांकडं पुण्याचं पालकमंत्रीपद, चंद्रकात पाटील यांच्याकडं सांगलीचं पालकमंत्रीपद तर माधुरी मिसाळ यांच्याकडं कोल्हापूरचं सहपालकमंत्रीपद देण्यात आलं आहे. मिसाळ यांच्यासोबत कोल्हापूरचे पालकमंत्री म्हणून प्रकाश आबिटकरही काम पाहणार आहेत.

**<u>प्रवेशपत्र</u>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बारावीच्या परीक्षेसाठीच्या प्रवेशपत्रावरील जात प्रवर्गाच्या उल्लेखावर आक्षेप घेतला गेल्याने बारावीच्या विद्यार्थ्यांना २३ जानेवारीपासून नवीन प्रवेशपत्रे उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

**<u>प्रादेशिकमनोरूग्णालय</u>**

पुण्यात येरवडा इथल्या प्रादेशिक मनोरूग्णालयात नैराश्य, चिंता, ताणतणाव आदी मानसिक आजारांवर अद्ययावत उपकरणाद्वारे उपचार करण्यात येणार आहेत. या मशिनचं उद्घाटन रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉक्टर श्रीनिवास कोलोड यांच्या हस्ते नुकतंच करण्यात आलं. या मनिशनच्या माध्यमातून उपचार करताना रुग्णाला भूल देण्याची गरज नाही.

**<u>उसगाळप-बारामती</u>**

पुणे जिल्ह्यात ऊस गाळप हंगाम सुरू झाल्यानंतर दोन महिन्यानंतर ६२ लाख २० हजार १२४ टन उसाचे गाळप पूर्ण झाले असून ५४ लाख ५० हजार ५९९ क्विंटल साखरेचं उत्पादन झालं आहे. पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यातील गाळप हंगाम घेत असलेल्या चौदा कारखान्यांमध्ये बारामती तालुक्यातील कारखान्यांनी आघाडी घेतली आहे.

**<u>कर्करोगमुक्त</u>**

पुण्यातील रुग्ण हक्क परिषदेच्या वतीनं कर्करोगमुक्त महाराष्ट्र अभियान हाती घेण्यात आलं आहे. या अभियानांतर्गत कर्करोगावरील उपचार मोफत करण्यात येणार आहेत, अशी माहिती अभियानाचे प्रमुख उमेश चव्हाण यांनी दिली. कर्करोगाचे उपचार घेताना रुग्णांना आर्थिक तडजोड करतानाच कर्जबाजारी व्हावं लागतं, ही बाब लक्षात घेऊन हे अभियान हाती घेण्यात आलं आहे. पुण्यातील युनिव्हर्सल हॉस्पिटल आणि होप हॉस्पिटल अँड कॅन्सर सेंटर मध्ये ही मोफत उपचार सुविधा उपलब्ध असणार आहे.

**<u>बाजारसमिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी इथल्या आवारात आज शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी घटल्यानं काही फळभाज्यांच्या भावात घसरण झाली. बहुतांश पालेभाज्यांचे दरही वीस टक्क्यांपर्यंत खाली आले आहेत. फळ बाजारात कलिंगड आणि पपईचे भाव वाढले आहेत. तर फुल बाजारात झेंडूचे भाव वाढले आहेत.

**<u>अपघात</u>**

पुण्याकडून मुंबईकडं जाणाऱ्या मुंबई द्रुतगती मार्गावर शिवशाही बसला भीषण आग लागली. ही दुर्घटना आज सकाळी नऊच्या सुमारास घडली. चालकानं प्रसंगावधान दाखवत सर्व प्रवाशांना खाली उतरवल्यामुळ कुठलीही जीवितहानी झाली नसून  कोणीही जखमी झालेलं नाही. बसनं अचानक पेट घेतल्यानं मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिकेवर वाहतूक कोंडी झाली होती.

**<u>क्रीडा</u>**

पुण्यामध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या आयोजित  करण्यासाठी प्रयत्न करू असं आश्वासन केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केलं. म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात आज पासून भारतीय जुडो महासंघाच्यावतीनं राष्ट्रीय जुडो स्पर्धा सुरू झाल्या आहेत यावेळी मोहोळ यांच्या हस्ते उप कनिष्ठ गटाच्या स्पर्धांचं उद्घाटन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. या गटामध्ये 29 राज्यातील 235 मुलं आणि 230 मुली सहभागी झाल्या आहेत.

**<u>रिव्हर सायक्लोथॉन</u>**

इंद्रायणी नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृतीसाठी इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन आज सकाळी उत्साहात पार पडली. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधले 35 हजारहून अधिक सायकलस्वार यामध्ये सहभागी झाल्याचं आमदार महेश लांडगे यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. भोसरी इथल्या गावजत्रा मैदानातून सुरू झालेली ही सायक्लोथॉन ५, १५ आणि २५ किलोमीटर अशा वेगवेगळ्या तीन गटात आयोजित करण्यात आली होती.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज १२ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सियस किमान तापमानची नोंद झाली. उद्या हवामान कोरडं असेल आणि किमान तापमान १२ तर कमाल ३० अंशांच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**